प्रेस नोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०९.०९.२०२१

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | १) संजय उत्तमराव केवट, वय ४६ वर्षे, पद – दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अमरावती<br>२) प्रशांत बाबुराव सांगोले, रा.देविनगर, वडाळी, अमरावती, खाजगी इसम |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | ०९.०९.२०२१ चे १३.४५ ते १४.०५ वा.दरम्यान |
| ४ | स्विकारलेली लाच रक्कम | ४०,०००/– रुपये |
| ५ | घटनास्थळ | रेल्वे स्टेशन अमरावती ते बस डेपो अमरावती रोडवरील मलकापूर अर्बन बॅकेसमोर, अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार हे त्यांचे वडीलांचे नावे परवाना असलेले बार रेस्टॉरंट चालवित असुन राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती येथील अधिकारी श्री.केवट, व कर्मचारी श्री.प्रशांत यांनी तक्रारदार यांना तुमचेकडून आम्हाला ५०,०००/– रुपये पाहिजेत अन्यथा आम्ही तुमचे स्टॉक रजिष्टर व गोडावुनमध्ये ठेवलेल्या मालामध्ये तफावत असल्याचे दाखवुन तुमचेविरुध्द कारवाई करु असे म्हणून तक्रारदार यांचे बार रेस्टॉरंटवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करणेकरीता ५०,०००/– रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक १६.०८.२०२० रोजी तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती येथील अधिकारी श्री.केवट, व कर्मचारी श्री.प्रशांत यांनी तक्रारदार यांना त्यांचे रेस्टॉरंटवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करणेकरीता तडजोडीअंती ४०,०००/– रुपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दिनांक ०९.०९.२०२१ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे श्री.संजय केवट, दुयम निरीक्षक यांचेकरीता श्री.प्रशांत सांगोले यांनी तक्रारदार यांचेकडून ४०,०००/– रुपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद आरोपींविरुध्द पो.स्टे.सिटी कोतवाली, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरुण सांवत, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.संजय महाजन, पोलीस उपअधीक्षक, श्री.एस.एस.भगत, पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पो.नि.संतोष इंगळे, पो.नि.सतीष उमरे, पो.ना.सुनिल व–हाडे, युवराज राठोड, महेंद्र साखरे, पो.कॉ.अभय वाघ, तुषार देशमुख, निलेश महिंगे, चालक स.पो.उ.नि.सतिष किटकूले, पो.ना.चंद्रकांत जनबंधु, पो.कॉ.उपेंद्र थोरात यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क** : अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५,
टोल फ्रि नंबर – १०६४

(संतोष इंगळे)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

OPPO F9 Pro · ©clicked by santosh

Scanned with CamScanner